# DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR.

**Circular / Syll. Sec./ A.C. Res./ Curriculum/ 2026.**

It is hereby inform to all concerned that, on the recommendation of Board of Studies; **the Academic Council at it's Meeting held on 28th July, 2026 has accepted the** ***"Curriculum of Pre-Ph.D. Course Work as per Guidelines of University"***.

**This is effective from the Academic Year 2026-27 and onwards as per appended herewith.**

All concerned are requested to note the contents of this circular and bring notice to the students, teachers and staff for their information and necessary action.

University campus,
Chhatrapati Sambhajinagar-431 004.
Ref. No. Syll. Sec./A.C. Res./
Curriculum/ 2026/ 221-24

Date: 31/ 07/ 2026.

**Deputy Registrar**
**Syllabus Section**

*******

**Copy forwarded with necessary action to:-**

1] **The Head, all concerned departments,**
2] **The Director,** University Network & Information Centre, UNIC, with **a request to upload this Circular on University Website.**
3] **The Director, Board of Examinations & Evaluation,**
4] **Public Relation Officer** [PRO],

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chhatrapati Sambhajinagar.

-=**=-

DrK*310726/-

# Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University

CHHATRAPATI SAMBHAJINAGAR–431 004, Maharashtra, India

---

**Curriculum List** of Subject Wise **Pre Ph.D. Course Work**
under the Faculty of Humanities

| Sr. No. | Curriculum/ Subject's |
|---|---|
| 01. | Marathi |
| 02. | Hindi |
| 03. | English |
| 04. | Urdu |
| 05. | Sanskrit |
| 06. | Arabic |
| 07. | Chinese |
| 08. | Sociology |
| 09. | Economics |
| 10. | History |
| 11. | Political Science |
| 12. | Public Administration |
| 13. | Geography |
| 14. | Psychology |
| 15. | Law |

--=**=--

*DrK*280726/-*

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर**

**पूर्व-पीएच्.डी.अभ्यासक्रम - १ (C–१) विषय : मराठी**

**एकूण श्रेयांक : ४** **अध्यापन तास : ६०** **एकूण गुण : १००**

**अभ्यासपत्रिका - १ ली**

## संशोधन पद्धती (Research Methodology)

**उद्दिष्टे –**

या अभ्यासक्रमाच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना-

१. संशोधनाची संकल्पना, स्वरूप, व्याप्ती,उद्दिष्टे, आवश्यकता आणि महत्त्व यांचे शास्त्रीय आकलन करून देणे.

२. संशोधनाची विविध प्रकारे वर्गवारी समजून घेऊन मूलभूत,उपयोजित,वर्णनात्मक,विश्लेषणात्मक व तुलनात्मक संशोधनाचे स्वरूप स्पष्ट करणे.

३. मराठी साहित्य,भाषा आणि संस्कृतीच्या अभ्यासातील संशोधनाची परंपरा,विकास आणि वर्तमानातील संशोधनक्षेत्रे यांचा परिचय करून देणे.

४. संशोधकाची भूमिका,आवश्यक गुणवैशिष्ट्ये आणि संशोधनातील नीतिमूल्ये यांची जाणीव निर्माण करणे.

५. संशोधन समस्या ओळखणे,तिची निश्चिती करणे आणि योग्य संशोधन विषयाची निवड करणे यासाठी आवश्यक निकष व कौशल्ये विकसित करणे.

६. संशोधन विषयाच्या आधारे संशोधनाची उद्दिष्टे,संशोधन प्रश्न, व्याप्ती आणि मर्यादा शास्त्रीय पद्धतीने निश्चित करण्याचे कौशल्य विकसित करणे.

७. मराठी साहित्य,भाषा आणि संस्कृतीतील विविध संशोधनक्षेत्रांचा चिकित्सक परिचय करून देऊन संशोधनासाठी योग्य क्षेत्र निवडण्याची क्षमता विकसित करणे.

८. वाङ्मय पुनरावलोकनाची प्रक्रिया समजावून देऊन पूर्वसंशोधनाचा चिकित्सक आढावा घेण्याची आणि संशोधनातील उणिवा व नवीन संशोधनाची शक्यता शोधण्याची क्षमता विकसित करणे.

९. प्राथमिक व दुय्यम साधने,संदर्भग्रंथ, नियतकालिके, शोधप्रबंध,ई-जर्नल्स, डिजिटल ज्ञानस्रोत आणि विविध कोश यांचा प्रभावीपणे वापर करण्याचे कौशल्य विकसित करणे.

१०.संदर्भलेखन,संदर्भसूची व ग्रंथसूची तयार करण्याच्या पद्धती आत्मसात करून शास्त्रीय संशोधनलेखनाची शिस्त निर्माण करणे.

११.संशोधनाला अनुकूल अशा संशोधन पद्धतीचा परिचय करून देणे.

| अ.क्र. | घटक | अभ्यासक्रमाचा तपशील | श्रेयांक | तासिका |
|---|---|---|---|---|
| १. | **संशोधनाची मूलभूत तत्त्वे** | १.१ संशोधन : अर्थ, संकल्पना, स्वरूप व व्याप्ती<br>१.२ संशोधनाची उद्दिष्टे व मुख्य हेतू<br>१.३ संशोधनाची आवश्यकता व महत्त्व<br>१.४ संशोधनाची वैशिष्ट्ये - शास्त्रीयता, वस्तुनिष्ठता, तार्किकता व पद्धतशीरपणा<br>१.५ संशोधनाचे प्रकार - मूलभूत, उपयोजित, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक व तुलनात्मक | १ | १५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | १.६ साहित्य, भाषा आणि संस्कृतीच्या अभ्यासातील संशोधनाचे स्वरूप<br>१.७ मराठी विषयातील संशोधनाची परंपरा व विकास<br>१.८ संशोधकाची भूमिका व संशोधकाचे गुण | | |
| २. | **संशोधन समस्या,विषय व उद्दिष्टांची निश्चिती** | २.१ संशोधन समस्या : संकल्पना,स्वरूप व महत्त्व<br>२.२ संशोधन समस्येची ओळख व निश्चिती<br>२.३ संशोधन विषयाची निवड व व्याख्या<br>२.४ संशोधन विषय निवडीचे निकष<br>२.५ संशोधन समस्येची निवड करताना घ्यावयाची काळजी<br>२.६ संशोधनाची उद्दिष्टे निश्चित करणे<br>२.७ संशोधन प्रश्नांची निर्मिती<br>२.८ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा<br>२.९ मराठी साहित्य,भाषा आणि संस्कृतीच्या संदर्भातील संशोधन क्षेत्रांची निवड<br>२.१० संतसाहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, लोकसाहित्य, आधुनिक साहित्य, भाषाविज्ञान, बोलीभाषा, तुलनात्मक साहित्य, अनुवाद, माध्यमांतर, माध्यमे व डिजिटल साहित्य इत्यादी संशोधन क्षेत्रे. | १ | १५ |
| ३. | **वाङ्मय पुनरावलोकन, संशोधन साधने व संदर्भलेखन** | ३.१ वाङ्मय पुनरावलोकन : संकल्पना,स्वरूप व उद्देश<br>३.२ पूर्वसंशोधनाचा आढावा घेण्याची आवश्यकता<br>३.३ पूर्वसंशोधनातील उणिवा व संशोधनातील नवीनता शोधणे<br>३.४ प्राथमिक व दुय्यम साधने<br>३.५ संदर्भग्रंथ, नियतकालिके,शोधप्रबंध, संशोधनपर लेख व ग्रंथसूची<br>३.६ ग्रंथालय व डिजिटल संशोधन साधनांचा उपयोग<br>३.७ ई-पुस्तके,ई-जर्नल्स,ऑनलाइन कोश व डिजिटल ज्ञानस्रोत<br>३.८ मराठी विश्वकोश,साहित्यकोश व इतर संदर्भसाधनांचा उपयोग<br>३.९ संदर्भ नोंदविण्याच्या पद्धती<br>३.१० संदर्भसूची व ग्रंथसूची तयार करणे<br>३.११ वाङ्मय पुनरावलोकनाच्या आधारे संशोधनातील नवीन क्षेत्र निश्चित करणे | १ | १५ |
| ४. | **गृहीतक, संशोधन रचना व निष्कर्षनिर्मिती** | ४.१ गृहीतक : अर्थ,संकल्पना व स्वरूप<br>४.२ गृहीतकाची आवश्यकता व महत्त्व<br>४.३ गृहीतकाचे प्रकार<br>४.४ सुयोग्य गृहीतकाची वैशिष्ट्ये<br>४.५ संशोधन समस्येच्या आधारे गृहीतकाची निर्मिती<br>४.६ गृहीतकाची मांडणी व परीक्षण<br>४.७ गृहीतकाच्या पडताळणीची प्रक्रिया<br>४.८ संशोधन प्रश्न व गृहीतक यांचा परस्परसंबंध<br>४.९ संशोधन पद्धती व संशोधन रचना<br>४.१० संशोधनासाठी योग्य साधने व स्रोतांची निवड | १ | १५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ४.११ माहितीचे संकलन,वर्गीकरण,विश्लेषण व अर्थनिर्वचन<br>४.१२ निष्कर्षनिर्मिती व संशोधनाचे उपयोजन | | |

**अध्ययन निष्पत्ती ( Course outcomes)**

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी -

१. संशोधनाची मूलभूत तत्त्वे स्पष्ट करू शकेल.
२. मराठी साहित्य,भाषा व संस्कृतीशी संबंधित संशोधन समस्या निश्चित करू शकेल.
३. संशोधन विषय,उद्दिष्टे व संशोधन प्रश्न निश्चित करू शकेल.
४. पूर्वसंशोधनाचा चिकित्सक आढावा घेऊ शकेल.
५. योग्य संदर्भसाधने व संशोधन साधने निवडू शकेल.
६. संदर्भलेखन व ग्रंथसूची तयार करू शकेल.
७. योग्य गृहीतक मांडून त्याची पडताळणी करू शकेल.
८. मराठी विषयातील संशोधनासाठी शास्त्रीय व पद्धतशीर दृष्टिकोन विकसित करू शकेल.
९. संशोधनातील माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व अर्थनिर्वचन करू शकेल.

**मूल्यमापन - १०० गुण**

घटक - १ २५ गुण
घटक - २ २५ गुण
घटक - ३ २५ गुण
घटक - ४ २५ गुण

(नोट -प्रत्येक घटकावर २५ पैकी २० गुणांची लेखी परीक्षा तर ५ गुणांची मौखिकी परीक्षा)

**संदर्भग्रंथ**

अ) मराठी साहित्य संशोधनासाठी मूलभूत ग्रंथ


१. देशमुख उषा माधव - मराठी संशोधनविद्या,स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९४.
२. देशमुख उषा माधव - साहित्य शोधणी,निहारा प्रकाशन,पुणे, १९८९.
३. संत दु. का. - संशोधन पद्धती : प्रक्रिया आणि अंतरंग,अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन,पुणे, १९९६.
४. संत दु. का. -शोधविज्ञानकोश,अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन,पुणे, १९८५.
५. राणे शं. रा. - मराठी साहित्य संशोधन : स्वरूप आणि दिशा,का.स.वाणी महाराष्ट्र प्रादेशिक संस्था,धुळे, १९९५/१९९६.
६. मालशे स.गं. -शोध निबंधांची लेखनपद्धती,लोकवाङ्मय गृह प्रकाशन,मुंबई, २००६.
७. आवलगावकर अविनाश (संपा.) - मराठी साहित्य संशोधन : नवी दिशा,प्रतिभा प्रकाशन, पुणे, २००६.
८. जोशी वसंत, म.ना. अदवंत,गं. ना. जोगळेकर व इतर (संपा.) - भाषा व साहित्य संशोधन,खंड १,२ व ३, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.
९. भावे म.पा. , श्रीहरी भिडे व वि. वा. शिरवाडकर (संपा.) - मराठी साहित्य संशोधन : स्वरूप,विचार,संज्ञा, महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे.
१०. शेलार सुधाकर - साहित्य संशोधन : वाटा आणि वळणे, अक्षरवाङ्मय प्रकाशन,पुणे,२०२०



प्रा.सर्जेराव जिगे
अध्यक्ष,मराठी अभ्यास मंडळ,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**पूर्व-पीएच्.डी.अभ्यासक्रम - २ (C–२) विषय : मराठी**

**एकूण श्रेयांक : ३ अध्यापन तास : ४५ एकूण गुण : ३०**

**अभ्यासपत्रिका - २ री**

## संशोधन प्रस्ताव लेखन, संशोधन साहित्याचा आढावा आणि संशोधन परिसंवाद

**उद्दिष्टे –**

या अभ्यासक्रमाच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना-

१. विद्यार्थ्यांना संशोधन संकल्पना, स्वरूप, उद्दिष्टे आणि प्रक्रियेची सखोल ओळख करून देणे.
२. संशोधन विषयाची निवड, समस्या निश्चिती आणि संशोधन प्रश्नांची मांडणी कौशल्य विकसित करणे.
३. विद्यार्थ्यांना संशोधन प्रस्ताव रचना, घटक आणि लेखनपद्धती समजावून देणे.
४. संशोधन विषयाशी संबंधित पूर्वसाहित्य, संदर्भग्रंथ, संशोधन प्रबंध आणि शोधनिबंध यांचा शोध व निवड करण्याचे कौशल्य विकसित करणे.
५. विद्यार्थ्यांना संशोधनातील पोकळी (Research Gap) ओळखण्याचे कौशल्य प्राप्त करून देणे.
६. संशोधनासाठी योग्य सैद्धांतिक चौकट, संशोधन पद्धती, नमुना, साधने आणि कार्यपद्धती निश्चित करण्याची क्षमता विकसित करणे.
७. संशोधन लेखनातील शास्त्रीय भाषा, संदर्भलेखन, उद्धरणपद्धती आणि संदर्भसूची वापरण्याचे प्रशिक्षण देणे.
८. संशोधन परिसंवादामध्ये संशोधन विषयाचे प्रभावी सादरीकरण, शैक्षणिक संवाद, प्रश्नोत्तर आणि चिकित्सक चर्चा कौशल्य विकसित करणे.
९. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार, स्वतंत्र संशोधनवृत्ती आणि संशोधनातील नैतिक मूल्ये विकसित करणे.

| अ.क्र. | घटक | अभ्यासक्रमाचा तपशील | श्रेयांक | तासिका |
|---|---|---|---|---|
| १. | **मराठी साहित्य संशोधनासाठी संशोधन प्रस्ताव लेखन व आर्थिक सहाय्य** | १. संशोधन प्रस्तावाची संकल्पना,स्वरूप,उद्दिष्टे व आवश्यकता<br>२. मराठी साहित्याच्या संशोधनासाठी विषयाची निवड व शीर्षक निश्चिती<br>३. संशोधन समस्या : स्वरूपमांडणी व निश्चिती<br>४. संशोधनाची उद्दिष्टे,संशोधन प्रश्न व त्यांचे स्वरूप<br>५. संशोधनाची गृहीतके व त्यांची उपयुक्तता<br>६. संशोधनाची व्याप्ती,कक्षा व मर्यादा<br>७. संबंधित मराठी साहित्य व पूर्वसंशोधनाचा आढावा<br>८. संशोधन पद्धती,दृष्टिकोन व संशोधन आराखडा<br>९. प्राथमिक व दुय्यम साधने,साहित्यस्रोत व संदर्भसाधने<br>१०.अपेक्षित निष्कर्ष,संशोधनाचे महत्त्व व योगदान<br>११.संशोधन कार्याचे टप्पे व वेळापत्रक<br>१२.संशोधनासाठी आवश्यक आर्थिक तरतूद व अंदाजपत्रक | १ | १५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | १३. राष्ट्रीय पातळीवरील संशोधनासाठी आर्थिक सहाय्य देणाऱ्या संस्था व त्यांच्या योजना<br>१४. संशोधन प्रस्तावाची मांडणी,परीक्षण,पुनर्रचना व सुधारणा | | |
| | प्रात्यक्षिक | विद्यार्थ्याच्या पीएच्.डी. संशोधन विषयावर संशोधन प्रस्ताव तयार करणे.<br>**अपेक्षित कृती**<br>प्रत्येक संशोधक विद्यार्थ्याने आपल्या मराठी विषयातील पीएच्.डी. संशोधन विषयाशी संबंधित शास्त्रीय स्वरूपाचा संशोधन प्रस्ताव तयार करून सादर करावा. प्रस्तावामध्ये विषयाची पार्श्वभूमी,संशोधन समस्या,उद्दिष्टे,प्रश्न/गृहीतके,व्याप्ती,मर्यादा,साहित्याचा आढावा,संशोधन पद्धती,साधने,अपेक्षित निष्कर्ष व संदर्भसूची यांचा समावेश असावा. | | |
| २. | **मराठी साहित्य संशोधनातील साहित्याचा आढावा व संशोधन लेखन** | १. संशोधन साहित्याचा आढावा : संकल्पना,स्वरूप,उद्देश व महत्त्व<br>२. संशोधन लेख,समीक्षा आणि साहित्याचा आढावा यातील भेद<br>३. मराठी साहित्याशी संबंधित संशोधन साहित्याचे संकलन व निवड<br>४. प्राथमिक,दुय्यम व तृतीयक स्रोत<br>५. ग्रंथ,नियतकालिके,संदर्भग्रंथ,संशोधन प्रबंध, शोधलेख व ई-स्रोतांचा उपयोग<br>६. मराठीतील पूर्वसंशोधनाचे वर्गीकरण,विश्लेषण व चिकित्सक परीक्षण<br>७. पूर्वसंशोधनातील उणिवा,मर्यादा व संशोधनाची पोकळी शोधणे<br>८. विविध संशोधन निष्कर्षांचा तुलनात्मक व चिकित्सक अभ्यास<br>९. संशोधन साहित्याच्या चिकित्सक परीक्षणाची पद्धती<br>१०.साहित्याच्या आढाव्याची तार्किक व शास्त्रीय रचना<br>११.संदर्भ नोंदविण्याच्या विविध पद्धती<br>१२.संदर्भलेखन,संदर्भसूची व ग्रंथसूची तयार करण्याची पद्धती<br>१३. संशोधनातील प्रामाणिकता,बौद्धिक संपदा व साहित्यचौर्य टाळण्याचे उपाय.<br>१४. मराठी संशोधन लेखनातील भाषा,शैली,परिभाषा व शास्त्रीय मांडणी | १ | १५ |
| | प्रात्यक्षिक | निवडलेल्या पीएच्.डी. संशोधन विषयावर संशोधन साहित्याचा चिकित्सक आढावा तयार करणे.<br>**अपेक्षित कृती**<br>प्रत्येक संशोधक विद्यार्थ्याने आपल्या पीएच्.डी. संशोधन विषयाशी संबंधित उपलब्ध मराठी भाषेतील संशोधन साहित्याचे संकलन,वर्गीकरण,विश्लेषण व चिकित्सक परीक्षण करून साहित्याचा शास्त्रीय आढावा सादर करावा. | | |
| ३. | **मराठी साहित्य संशोधन परिसंवाद व शैक्षणिक सादरीकरण** | १. परिसंवादाची संकल्पना,स्वरूप,उद्दिष्टे व शैक्षणिक महत्त्व<br>२. मराठी साहित्य संशोधनासाठी परिसंवादाच्या विषयाची निवड<br>३. परिसंवादासाठी संशोधन लेखाची तयारी<br>४. संशोधन विषयाची तार्किक,शास्त्रीय व प्रभावी मांडणी<br>५. संशोधन लेखाची प्रस्तावना,मुख्य विवेचन व निष्कर्ष यांची रचना<br>६. तक्ते व दृश्य साधनांचा योग्य वापर | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ७. शैक्षणिक व संशोधनपर सादरीकरणाचे कौशल्य<br>८. वेळेचे नियोजन व प्रभावी सादरीकरण<br>९. प्रश्नोत्तरांना सामोरे जाण्याचे तंत्र<br>१०.शैक्षणिक चर्चेतील संवादकौशल्य व चिकित्सक दृष्टिकोन<br>११.संदर्भ व संदर्भसूचीचा योग्य वापर<br>१२.संशोधन निष्कर्षांचे प्रभावी व तर्कशुद्ध सादरीकरण<br>१३. सहकारी संशोधकांकडून अभिप्राय,परीक्षण व सुधारणा.<br>१४. संशोधन सादरीकरणातील शैक्षणिक शिष्टाचार व संशोधन नीतिमत्ता | १ | १५ |
| | **प्रात्यक्षिक** | पीएच्.डी.संशोधन विषयावर १५ ते २० मिनिटांचा परिसंवाद सादरीकरण.<br>**अपेक्षित कृती**<br>प्रत्येक संशोधक विद्यार्थ्याने आपल्या पीएच्.डी. संशोधन विषयावर आधारित संशोधनपर लेख तयार करून त्याचे १५ ते २० मिनिटांचे शास्त्रीय सादरीकरण करावे. सादरीकरणानंतर उपस्थित संशोधक व मार्गदर्शकांच्या प्रश्नांना तर्कशुद्ध उत्तरे द्यावीत. | | |

**अध्ययन निष्पत्ती ( Course outcomes)**

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी -

१. मराठी साहित्याच्या संशोधनासाठी शास्त्रीय पद्धतीने संशोधन प्रस्ताव तयार करू शकेल.
२. योग्य संशोधन विषय,शीर्षक व संशोधन समस्या निश्चित करू शकेल.
३. संशोधनाची उद्दिष्टे,संशोधन प्रश्न व गृहीतके शास्त्रीय पद्धतीने निश्चित करू शकेल.
४. मराठी साहित्याशी संबंधित प्राथमिक व दुय्यम स्रोतांचा योग्य वापर करू शकेल.
५. उपलब्ध संशोधन साहित्याचे संकलन,वर्गीकरण,विश्लेषण व चिकित्सक परीक्षण करू शकेल.
६. पूर्वसंशोधनातील उणिवा व संशोधनाची पोकळी (Research Gap) निश्चित करू शकेल.
७. शास्त्रीय पद्धतीने साहित्याचा आढावा लिहू शकेल.
८. संशोधन लेखनात योग्य संदर्भ,संदर्भसूची व ग्रंथसूची तयार करू शकेल.
९. साहित्यचौर्य टाळून संशोधन नीतिमत्तेचे पालन करू शकेल.
१०. संशोधनासाठी उपलब्ध विविध आर्थिक सहाय्याच्या योजनांची माहिती घेऊन त्यांचा योग्य वापर करू शकेल.
११. आपल्या संशोधनाचे प्रभावी,तर्कशुद्ध व शास्त्रीय पद्धतीने परिसंवादात सादरीकरण करू शकेल.
१२. संशोधनावरील प्रश्नांना चिकित्सक,तर्कशुद्ध व शास्त्रीय पद्धतीने उत्तरे देऊ शकेल.

**मूल्यमापन - ३० गुण**

संशोधन प्रस्ताव - १० गुण

संशोधन साहित्याचा आढावा व लेखन - १० गुण

संशोधन परिसंवाद सादरीकरण - १० गुण

**एकूण - ३० गुण**

**संदर्भग्रंथ**

**अ) मराठी साहित्य संशोधन**


१. मालशे मिलिंद - साहित्य संशोधन : स्वरूप व पद्धती, मुंबई : मौज प्रकाशन गृह,२०००.
२. जाधव रा. ग. -साहित्य संशोधन : स्वरूप आणि पद्धती, पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस, २००४.

३. जोशी प्र. न. - साहित्य संशोधनाची सूत्रे, पुणे : पद्मगंधा प्रकाशन,२००५.
४. पाटील शंकर-साहित्य संशोधन आणि समीक्षा, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स, २००८.
५. भालेराव पु. ग.- साहित्य संशोधनाची पद्धती, पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस, २००३.
६. घाटे वा.ल. - संशोधन पद्धती, पुणे : महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळ,१९९८.
७. कुलकर्णी कृ.पां. - संशोधन पद्धतीचे स्वरूप, पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९९९.

**आ) शैक्षणिक संशोधन**

१. दांडेकर वा. रा. - शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे : श्रीविद्या प्रकाशन,२०००.

प्रा.सर्जेराव जिगे
अध्यक्ष.मराठी अभ्यास मंडळ,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर**

**पूर्व-पीएच्.डी.अभ्यासक्रम - ३ (C–३) विषय : मराठी**

**विषयविशिष्ट प्रगत स्तर** (Subject-Specific Advanced Level Course)

**एकूण श्रेयांक : ३** **अध्यापन तास : ४५** **एकूण गुण : ५०**

**अभ्यासपत्रिका - ३ री**

## मराठी भाषा व साहित्य : प्रगत अध्ययन, संशोधन व समीक्षात्मक दृष्टिकोन

**उद्दिष्टे –**

या अभ्यासक्रमाच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना-

१. मराठी भाषा व साहित्याच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाचा चिकित्सक अभ्यास करणे.
२. मराठीतील विविध साहित्यप्रकार, वाङ्मयीन प्रवाह व साहित्यिक चळवळी यांचे प्रगत अध्ययन करणे.
३. भारतीय व पाश्चात्त्य साहित्यशास्त्र आणि विविध समीक्षा पद्धतींचा परिचय करून घेणे.
४. भाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून मराठी भाषा, बोलीभाषा आणि समकालीन भाषिक व्यवहाराचा अभ्यास करणे.
५. समकालीन मराठी साहित्याचे सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक व आंतरशाखीय संदर्भात विश्लेषण करणे.
६. संशोधकांमध्ये चिकित्सक, तुलनात्मक, विश्लेषणात्मक आणि संशोधनाभिमुख दृष्टिकोन विकसित करणे.

| अ.क्र. | घटक | अभ्यासक्रमाचा तपशील | श्रेयांक | तासिका |
|---|---|---|---|---|
| १. | **मराठी भाषा व साहित्य : ऐतिहासिक व विकासात्मक अध्ययन** | १. मराठी भाषेची उत्पत्ती, स्वरूप व विकास<br>२. मराठी भाषेच्या विकासाचे प्रमुख टप्पे<br>३. प्राचीन,मध्ययुगीन व अर्वाचीन मराठी भाषा<br>४. मराठी साहित्याचा ऐतिहासिक विकास<br>५. संत साहित्याची परंपरा व वैशिष्ट्ये<br>६. भक्ती,वारकरी व सूफी साहित्यपरंपरा<br>७. शाहिरी व पंडिती साहित्य<br>८. आधुनिक मराठी साहित्याची निर्मिती व विकास<br>९. मराठी साहित्य आणि सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन<br>१०.मराठी साहित्याचा इतर भारतीय भाषांशी अनुबंध<br>११.मराठी साहित्य आणि सामाजिक शास्त्रे<br>१२.मराठी साहित्याच्या विकासातील प्रमुख वाङ्मयीन प्रवाहांची पार्श्वभूमी.<br>(**अध्ययनाचा विशेष भर** - मराठी भाषा व साहित्याचा केवळ कालानुक्रमिक इतिहास न पाहता भाषा,साहित्य,समाज,संस्कृती आणि परिवर्तन यांचा परस्परसंबंध चिकित्सकपणे अभ्यासणे.) | १ | १५ |
| २. | **मराठी साहित्यप्रकार ,** | १. साहित्याचे स्वरूप,प्रयोजन व मूल्य<br>२. कविता : स्वरूप,आशय,प्रतिमा,प्रतीक व शैली<br>३. कथा : स्वरूप,विकास व आधुनिक प्रवाह | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **साहित्यशास्त्र व समीक्षा** | ४. कादंबरी : स्वरूप,तंत्र व विकास<br>५. नाटक : रचना,तंत्र व प्रयोगशीलता<br>६. आत्मचरित्र व चरित्र<br>७. ललित गद्य,प्रवासवर्णन व व्यक्तिचित्रण<br>८. वैचारिक साहित्य व सर्जनशील लेखन<br>९. साहित्यशास्त्राची संकल्पना,स्वरूप व व्याप्ती<br>१०.भारतीय काव्यशास्त्र : रस,ध्वनी,अलंकार, रीती,वक्रोक्ती इत्यादी<br>११.पाश्चात्य साहित्यविचार<br>१२.ऐतिहासिक,समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय समीक्षा<br>१३.मार्क्सवादी,स्त्रीवादी व दलित समीक्षा<br>१४.संरचनावादी व उत्तरसंरचनावादी समीक्षा<br>१५.तुलनात्मक व आंतरशाखीय साहित्यविचार<br>(**अध्ययनाचा विशेष भर -** साहित्यकृतीचे आशय, रूप, भाषा, तंत्र, मूल्य, सौंदर्य आणि सामाजिक संदर्भ यांच्या आधारे चिकित्सक विश्लेषण करण्याची क्षमता विकसित करणे.) | १ | १५ |
| ३. | **वाङ्मयीन प्रवाह, समकालीन साहित्य, भाषाविज्ञान व संशोधनदृष्टी** | **अ) वाङ्मयीन प्रवाह व समकालीन साहित्य**<br>१. विविध वाङ्मयीन प्रवाह व त्यांची सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी<br>२. दलित साहित्य चळवळ<br>३. ग्रामीण साहित्यप्रवाह<br>४. स्त्रीवादी साहित्यप्रवाह<br>५. आदिवासी साहित्य<br>६. जनवादी व प्रगतिशील साहित्य<br>७. नवसाहित्य व आधुनिकतावादी प्रवाह<br>८. उत्तरआधुनिक साहित्यप्रवाह<br>९. विविध सामाजिक चळवळी आणि मराठी साहित्य<br>१०.साहित्य व सामाजिक परिवर्तन<br>११.समकालीन मराठी साहित्याच्या दिशा,प्रवृत्ती व आव्हाने<br>**ब) भाषाविज्ञान व मराठी भाषा-अभ्यास**<br>१. भाषाविज्ञान : स्वरूप, व्याप्ती व महत्त्व<br>२. ऐतिहासिक,वर्णनात्मक व सामाजिक भाषाविज्ञान<br>३. ध्वनिविज्ञान,रूपविज्ञान, वाक्यविन्यास व अर्थविज्ञान<br>४. शैलीविज्ञान<br>५. मराठीतील बोलीभाषा व प्रमाणभाषा<br>६. तुलनात्मक भाषाविज्ञान<br>७. भाषा व तंत्रज्ञान<br>८. माध्यमांची भाषा व माध्यमांतर<br>९. अनुवादशास्त्र व अनुवादाचे स्वरूप<br>**क) संशोधनाभिमुख अध्ययन**<br>१. संशोधन विषयाची निवड व संशोधन समस्या निश्चिती | १ | १५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २. संशोधन प्रश्न व गृहीतके<br>३. प्राथमिक व दुय्यम साधनांचे संकलन<br>४. संदर्भग्रंथ व ई-संसाधनांचा शोध<br>५. साहित्याचा चिकित्सक, तुलनात्मक व आंतरशाखीय अभ्यास<br>६. संदर्भलेखन व संदर्भसूची<br>७. संशोधनातील वस्तुनिष्ठता,नैतिकता व साहित्यचौर्य प्रतिबंध<br>८. संशोधन लेख व शोधनिबंध लेखन<br>९. डिजिटल साधनांचा संशोधनातील उपयोग<br>(**अध्ययनाचा विशेष भर** - समकालीन साहित्य, भाषा आणि समाज यांचा अभ्यास करताना संशोधनात्मक, चिकित्सक, तुलनात्मक, आंतरशाखीय व डिजिटल दृष्टिकोन विकसित करणे.) | | |

**अध्ययन निष्पत्ती ( Course outcomes)**

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी -

१. मराठी भाषा व साहित्याच्या ऐतिहासिक विकासाचे चिकित्सक विश्लेषण करता येईल.
२. विविध मराठी साहित्यप्रकारांचे आशय रूप, तंत्र,भाषा व मूल्य यांच्या आधारे विश्लेषण करता येईल.
३. भारतीय व पाश्चात्त्य साहित्यसिद्धांत आणि विविध समीक्षा पद्धतींचा साहित्यसंशोधनात उपयोग करता येईल.
४. मराठी भाषा, बोलीभाषा व भाषिक व्यवहाराचा भाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करता येईल.
५. विविध वाङ्मयीन प्रवाह, साहित्यिक चळवळी आणि समकालीन साहित्याचे सामाजिक-सांस्कृतिक संदर्भात विश्लेषण करता येईल.
६. पीएच्.डी. संशोधनासाठी संशोधनविषय, संशोधनसमस्या, संदर्भसाधने, डिजिटल साधने आणि संशोधनलेखन यांचा योग्य वापर करता येईल.

**मूल्यमापन - ५० गुण**

अंतर्गत मूल्यमापन / सादरीकरण - ०५ गुण
संशोधनाधारित लेख / असाइनमेंट - ०५ गुण
परिसंवाद / मौखिक सादरीकरण - १० गुण
अंतिम परीक्षा - ३० गुण

**एकूण - ५०**

**संदर्भग्रंथ**


१. जोशी वसंत (संपा.) - भाषा व साहित्य संशोधन,महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे, १९८१.
२. देशमुख उषा माधव - मराठी संशोधनविद्या,स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे, १९९४.
३. संत दु.का. - संशोधन पद्धती : प्रक्रिया आणि अंतरंग,अनाथ विद्यार्थीगृह प्रकाशन,पुणे,१९६६.
४. चुनेकर सु. रा. व रंगनाथ पठारे - संशोधन : स्वरूप आणि पद्धती,संगमनेर शिक्षण प्रसारक संस्था,संगमनेर, १९८३.
५. आवलगावकर अविनाश (संपा.) - मराठी साहित्य संशोधन : नवी दिशा,प्रतिभा प्रकाशन,पुणे, २००६.
६. शेलार सुधाकर, साहित्यसंशोधन : वाटा आणि वळणे,अक्षरवाङ्मय प्रकाशन,पुणे, २०२०.
७. लिंबाळे शरणकुमार, दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र,कांता प्रकाशन, सोलापूर, १९९६.
८. डहाके वसंत आबाजी - मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००८.
९. भावे वि.ल. -महाराष्ट्र सारस्वत,खंड १ व २,पॉप्युलर प्रकाशन,मुंबई,१९६३.
१०.केळकर अशोक- भाषाविज्ञान आणि मराठी भाषा



प्रा.सर्जेराव जिगे
अध्यक्ष,मराठी अभ्यास मंडळ,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर**

**पूर्व-पीएच्.डी.अभ्यासक्रम - ४ (C-४) विषय : मराठी**

**एकूण श्रेयांक : २** **अध्यापन तास : ३०** **एकूण गुण : २०**

**अभ्यासपत्रिका - ४ थी**

## संशोधन व प्रकाशन नीतिशास्त्र (Research and Publication Ethics)

**उद्दिष्टे –**

या अभ्यासक्रमाच्या अध्ययनातून विद्यार्थ्यांना-

१. मराठी साहित्य,भाषा व संस्कृतीच्या संशोधनातील नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण करणे.
२. संशोधनातील प्रामाणिकपणा,वस्तुनिष्ठता व पारदर्शकता यांचे महत्त्व समजून घेणे.
३. साहित्यिक व संशोधनात्मक लेखनातील वाङ्मयचौर्य टाळण्याचे ज्ञान प्राप्त करणे.
४. संदर्भलेखन,उद्धरण,संदर्भसूची व बौद्धिक संपदा यांचा योग्य वापर करणे.
५. संशोधन लेख व प्रबंध प्रकाशित करताना आवश्यक असलेल्या प्रकाशन नीतिमूल्यांची ओळख करून घेणे.

| अ.क्र. | घटक | अभ्यासक्रमाचा तपशील | श्रेयांक | तासिका |
|---|---|---|---|---|
| १. | संशोधनातील नीतिशास्त्र | **संशोधन**<br>१.१ नीतिशास्त्र : संकल्पना, स्वरूप व गरज<br>१.२ मराठी भाषा व साहित्य संशोधनातील नैतिक मूल्ये, संशोधनातील प्रामाणिकता, वस्तुनिष्ठता व पारदर्शकता<br>१.३ संशोधन समस्या, उद्दिष्टे व निष्कर्ष यांमधील प्रामाणिकपणा<br>१.४ प्राथमिक व दुय्यम साधनांचा योग्य वापर<br>१.५ लेखकत्व व सहलेखकत्वाचे नियम, संशोधनातील हितसंबंधांचा संघर्ष<br>१.६ संशोधनातील माहिती व संदर्भांचे संरक्षण | ०.५ | ०७ |
| २. | वाङ्मयचौर्य व बौद्धिक संपदा | २.१ वाङ्मयचौर्य व बौद्धिक संपदा<br>२.२ वाङ्मयचौर्य (Plagiarism) : संकल्पना व प्रकार<br>२.३ शब्दशः कल्पनात्मक व अनुवादातील वाङ्मयचौर्य, स्व-वाङ्मयचौर्य<br>२.४ योग्य उद्धरण व संदर्भलेखनाची पद्धत, संदर्भसूची (Bibliography / References) तयार करण्याचे नियम<br>२.५ कॉपीराइट (Copyright) व बौद्धिक संपदा अधिकार<br>२.६ प्रकाशित व अप्रकाशित साहित्याच्या वापरातील नैतिकता<br>२.७ डिजिटल साधने व इंटरनेटवरील साहित्याचा जबाबदारीने वापर | ०.५ | ०८ |
| ३. | मराठी संशोधनातील प्रकाशन नीतिशास्त्र | ३.१ संशोधन लेखाचे स्वरूप व रचना<br>३.२ संशोधन लेख,समीक्षा लेख व शोधप्रबंध लेखनातील नीतिमूल्ये<br>३.३ नियतकालिकांची निवड व दर्जेदार संशोधन | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ३.४ नियतकालिकांची वैशिष्ट्ये, संपादक, समीक्षक व लेखक यांच्या जबाबदाऱ्या.<br>३.४ पिअर रिव्हयु प्रक्रियेचे स्वरूप व नीतिनियम, खोटी/भ्रामक माहिती, बनावट संदर्भ व बनावट निष्कर्ष टाळणे.<br>३.५ एकाच संशोधनाचे पुनर्प्रकाशन व भ्रामक प्रकाशनांपासून सावधगिरी<br>३.६ संशोधन निष्कर्षांचे योग्य व जबाबदार सादरीकरण. | ०.५ | ०७ |
| ४. | व्यावहारिक उपक्रम | **विद्यार्थ्यांकडून पुढीलपैकी उपक्रम करून घेण्यात यावेत-**<br>४.१ मराठी विषयावरील संशोधन लेखाचे नैतिक परीक्षण.<br>४.२ दिलेल्या परिच्छेदातील वाङ्मयचौर्य ओळखणे व त्याचे योग्य पुनर्लेखन करणे.<br>४.३ संशोधन विषयाशी संबंधित संदर्भांची मराठी भाषेशी सुसंगत MLA पद्धतीने संदर्भसूची तयार करणे.<br>४.४ Plagiarism Detection Software च्या अहवालाचे विश्लेषण.<br>४.५ संशोधन लेखासाठी योग्य नियतकालिकाची निवड व त्याच्या प्रकाशन<br>४.६ नीतिनियमांचा अभ्यास -'मराठी साहित्य संशोधनातील संशोधन व प्रकाशन नीतिशास्त्र' या विषयावर परिसंवाद/सादरीकरण. | ०.५ | ०८ |

**अध्ययन निष्पत्ती ( Course outcomes)**

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी -

१. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर संशोधकास मराठी भाषा व साहित्याच्या संशोधनात संशोधन प्रामाणिकता,संदर्भलेखन, वाङ्मयचौर्य प्रतिबंध,बौद्धिक संपदा आणि प्रकाशन नीतिशास्त्र यांचा योग्य वापर करता येईल.

**मूल्यमापन - २० गुण**

लेखी परीक्षा / सैद्धांतिक ज्ञान -१० गुण

व्यावहारिक कार्य / सादरीकरण - १० गुण

**एकूण - २० गुण**

**संदर्भग्रंथ**


१. जोशी रा. ग. -संशोधन पद्धती आणि प्रक्रिया,पुणे, २०१०.
२. गाडगीळ, गंगाधर - साहित्याचा अभ्यास,पुणे, २००७.
३. कुलकर्णी कृ. पां. - संशोधन : स्वरूप व पद्धती,पुणे, २००८.
४. माटे, श्री. म. - वाङ्मयीन संशोधन,पुणे, २००५.
५. विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) - उच्च शिक्षण संस्थांमध्ये शैक्षणिक प्रामाणिकता व वाङ्मयचौर्य प्रतिबंध विनियम,नवी दिल्ली,२०१८.
६. सावंत, वि. भा. - साहित्य संशोधनाची दिशा,मुंबई, २००८.
७. भालेराव रा. रं. - साहित्य संशोधन : तत्त्वे आणि व्यवहार, औरंगाबाद,२०१२.
८. Comstock, Gary D. - Research Ethics: A Philosophical Guide to the Responsible Conduct of Research, Cambridge University Press, केंब्रिज, २०१३.
९. १०.Committee on Publication Ethics (COPE)- Ethical Guidelines for Peer Reviewers, Committee on Publication Ethics, २०१७.


प्रा.सर्जेराव जिगे
अध्यक्ष.मराठी अभ्यास मंडळ,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर